**नि. फौ. ख. क्र. १४२/२०२२**
**सरकार / प्रमोद**
**<u>नि.क्र. १५</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची शपथेवर साक्ष**

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगते की —

माझे नाव : अपेक्षा अविनाश रामटेके,

वय : २६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,
रा. : सिध्दार्थ नगर, बोरगाव मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती आर. आर. तिवारी मार्फत</u>**

१. घटना दि. ०१/०२/२०२२ रोजी रात्री ८:१५ वाजताच्या सुमारास आरोपी प्रमोद चुनारकर याचे घरी घडली होती. त्यावेळी माझे पती अविनाश आरोपीचा भाउ आशिष याचेकडे गाडी मागण्याकरीता गेले होते. त्यामुळे माझे पती आशिषच्या घरी का गेले या कारणावरून आरोपीने माझे पतीला शिवीगाळ केली होती. त्यावेळी मी माझे घरामध्ये होती. आवाज आल्यामुळे मी बाहेर आली तेव्हा मला आरोपी व माझे पतीची हातापाई चालु असल्याचे दिसले होते.

२. आरोपीने त्याचेकडील चाकुने माझे पतीचे डाव्या बाजुचे काखेमध्ये चाकुने मारहाण केली होती. त्यामुळे माझे पतीने पोलिसात तक्रार दिली होती. चाकुने मार लागल्यामुळे माझे पतीला चार टाके लागले होते. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. *(साक्षीदाराने न्यायालयात उपस्थित आरोपीकडे बोट दाखविले.)*

**सर तपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. एम. डब्ल्यु. बेग मार्फत</u>**

३. पोलिस घटनेच्या दुस—या दिवशी म्हणजे दि. ०३/०२/२०२२ रोजी आमचे घरी आले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटना दि. ०२/०१/२०२२ च्या नंतरची नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना रात्रीच्या वेळी घडली होती. हे म्हणणे खरे आहे की, जानेवारी—फेब्रुवारीच्या महिन्यामध्ये हिवाळा असल्याने लवकर अंधार पडतो.

४.		मी पोलिसांना बयाण देतांना माझे पती गाडी मागण्याकरीता आशिषकडे गेल्याचे सांगितले होते. तसेच मला काही वेळाने आवाज आल्याचे सुध्दा सांगितले होते. मी पोलिसांना बयाण देतांना मी गेली तेव्हा हातापाई चालु असल्याची बाब सुध्दा सांगितली होती. हातापाई चालु असल्याची बाब पोलिसांनी माझे बयाणामध्ये का नमुद केली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलिसांना माझे पतीला चार टाके लागल्याचे सांगितले नव्हते.

५.		हे म्हणणे खरे आहे की, आशिष व प्रमोद हे सावत्र भाउ आहेत आणि त्या दोघांचे पटत नाही. आरोपीने आशिषविरूध्द तक्रार दिल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रमोद व आशिष यांचा प्रमोदच्या पत्नीबाबत वाद होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रमोदला आशिषने त्याची पत्नी पळवून नेली असे वाटत होते. हे म्हणणे खरे आहे की, आशिष व माझे पती हे चांगले मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आशिष व आरोपी यांचे घराकडे जाण्यासाठी एकच रस्ता आहे व तो ३ फुट रूंदीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आशिषचे घर आरोपीच्या घराच्या डावे बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराच्या डावे बाजूला एक गल्ली आहे व त्यानंतर आमचे घर आहे आणि तेथे समोर छायाबाई कांबळे हिचे घर आहे.

६.		हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी छायाबाई व इतर लोकसुध्दा होते. घटनेच्या वेळी छायाबाई घरी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी आवाज आल्यानंतर गेली व तेथे नेमके काय घडले हे मला तेथे गेल्यानंतर कळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आशिषने माझे पतीला तक्रार द्यायला सांगितल्यामुळे माझे पतीने तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पतीने सांगितल्याप्रमाणे पोलिसांना बयाण दिले होते. माझे पोलिस बयाणातील माझे पतीने मला सांगितल्याची बाब बरोबर आहे.

७.		हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे माझे पती व आशिष सोबत जमत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या वेळी तेथे हजर नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझे पतीला कोणतीही शिवीगाळ केली नाही अथवा चाकुने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पतीच्या सांगण्यावरून आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. ब. अ. क. के. माझे समक्ष,

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा.
दिनांक : २२.०७.२०२५

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)